**सीतानवमी**

हे रामा
रामनवमी
तुझा जन्मोत्सव ...
नि तू म्हणे
मर्यादा पुरुषोत्तम .....

सीतेला पळवून नेणारा रावण
तिच्या मनाचा विचार करत
तिची मर्जी संपादण्यासाठी
करत राहतो विनंती
अन् स्पर्श करतच नाही तिला
तेही त्याच्याच लंकेत
...ही मर्यादा नाही का ?

मातृसत्ताक असूर संस्कृतीचा सुविद्य
रावण कुठे
नि खऱ्या खोट्याची शहानिशा न करता
लोकापवादासाठी
तिला वनात धाडणारा
तू कुठे?
तेही ऐन गर्भारपणात
कुठे जायचे तिने
की भक्ष्य व्हायचे श्वापदांचे
स्वतःच्या पत्नीला
न्याय न देऊ शकणारा
तू
मर्यादा पुरुषोत्तम तरी कसा ?

मात्र तेव्हा
हरलास तू
जेव्हा भूमातेलाच आली दया आणि
तिने केला धरणीकंप,
घेतले कुशीत
लेकीला
पण सीतेला
नाही सोपवलं तुझ्याकडे.
यापेक्षा तुझी मानहानी कोणती?
स्वतःच्या मुलांचेही
पालनपोषण न करणारा
तू
जगाचा पालनहारी कसा?

यापेक्षा
सीतानवमीचं का साजरी करू नये ?
ती राहिली प्रामाणिक तुझ्याशी
आणि निभावलाच तुला हवा तसा पत्नीधर्म
प्रसवले तुझ्या मुलांना,
घडवले तुझ्यापेक्षाही पराक्रमी आणि
घेतलेच गाडून मातीत
पुन्हा पुन्हा उगवण्यासाठी...!!

**रचना स्वामी**
rachanasahity@gmail.com

**जागतिकीकरणोत्तर**

किती कचरा झालाय
कुणी केला हा सगळा कचरा
आपलीच माणसं की बाहेरची?
कुठे निघून गेली
पार वाट लावली
...आता हे कोण निस्तरणार
आपल्याच पायावर धोंडे पडणार

नातीगोती उद्ध्वस्त झाली
शब्दांची भांडीदेखील
सीलबंद केली
बोलीभाषांचे गळे चिरले
वेशीबाहेर फेकून दिले
सर्वत्र पसरलेले इंग्रजाळलेले कपटे
त्यांनी प्रत्येक जिभेवर डकवले
बोलीचे रक्त
हृदया हृदयी द्यायचे कसे

संस्कृती, परंपरेच्या चिंधड्या करून
त्यांनी रस्तोरस्ती फेकून दिल्या
इतिहासाची खांडोळी
बाजारपेठेत मटणासारखी विकली
सगळाच खाटिकखाना करून टाकलाय
...आता कोण आवरणार हे सगळं

अडगळ नसणारे समृद्ध मेंदू
त्यांनी भंगारात काढले
'यूज अँड थ्रो'ला भुलून
माणुसकीचे मुडदे पाडले
सैन्यापासून सामान्यांपर्यंत
'गिऱ्हाईक' केलंय
माणसामाणसाला वस्तू बनवलंय
आणि प्रत्येक घटनेचा 'अर्थ'
बाजारात खेळता ठेवलाय
कचरा केलाय सगळा कचरा

आता लिदीचे ढीग उपसायचे
माणुसकीचे झरे शोधायचे
पूर्वी होते तसे सगळे,
सजवून ठेवायचे!

**नारायण लाळे**
narayanlale@gmail.com

**प्रच्छन्न वाळवीचे यशोगान...**

कोमेजलेल्या पंखांसोबत
पाठविलेले हताश संदेश
रस्त्यातच गहाळ होतात...
निष्पर्ण वृक्षावर बसलेले पाखरू
चिवचिवाट विसरून मुके होतात...
आणि
चौकाचौकात पसरलेले मानवी पुंजके
'भिक्षां देहि' करत फिरतात.

आळसावलेल्या पहाटेला
जागे झालेले मुंग्यांचे वारूळ
सूर्य नमस्कार 'घालतात'...
कित्येक दिवसात पाऊसच नाही
रात्री मात्र भरपूर ढगाळतात...
आणि
कावळ्याच्या घरट्यात उबवलेली
कोकीळेची अंडी
वांझ ठरतात.

आक्रसलेल्या स्तनात नाही दूध
नवरे मात्र मस्तवाल
शहरोशहरी भटकतात...
गावागावातील सुनसान गल्ल्या
कुत्र्यांसोबत रात्रीं घालवतात...
आणि
भयाण दिसणाऱ्या वाड्याच्या पडक्या भिंती
भूतांनाही आसरा नाकारतात.

**बहकलेली शोधप्रक्रिया...**

मी
सीमेवर गावाच्या
शहराचा रस्ता शोधतो
मी
सीमेवर शहराच्या
गावाचा रस्ता शोधतो
गल्लीत गावाच्या
सिमेंटचा तोकडा रस्ता तुडवतो
शहरात मात्र
कचरा-ढिगावरूनच रस्ताळतो.

जंगलाची व्याख्या बदलता
मी सुद्धा पाषाणहृदयी होतो
अपार्टमेंटच्या नळाला
उंदीर आडवा येतो
गावाच्या यमकाला
शहराच्या मुक्तछंदाची
भीतीही दाखवतो
शोधप्रक्रिया शोधू लागतो.

वाड्यावाड्यात मोकाट पसरलेल्या
अंधाराला प्रकाश दाखवतो
मी
पावलोपावली भ्रमित भ्रमितांना
चकव्यातून सोडवतो
मी
सीमेवर गावाच्या
शहराचा रस्ता शोधतो...

**लखनसिंह**
**कटरे**
lskatre55@gmail.com

**सात सक्कं...**

किरण
तू किती भिनलाहेस
माझ्या थेंबथेंब रक्तात

परवाच भिरभिर नातीला
पाढे शिकवताना
नकळत म्हणून गेलो
सात सक्कं त्रेचाळीस
अन् नात एकदम ओरडली
'आजोबा, सात सक्कं बेचाळीस,
तुम्हाला पाढेच येत नाही.'

होय बेटा
रघूचं जिणं मी समुद्राच्या
किनाऱ्यावर जगलोय
तो किनारा माझ्या
ॲड्रेस बुकमध्ये बहरला होता
तुला तर
अजून रेतीही दिसलेली नाही

हे अफलातून शॉर्टकटस्
जंपकटस्
आणखी असंच काही
मी नेणिवेच्या पातळीवर
जागा झालेला
माझ्या लेखणीला
चढलेला दाह
तुझ्या कुठल्या नंदाढेलात
विसर्जित करू

हे इतक्या वर्षांनंतर
अगदीच त्रोटक
पण सविस्तर लिहिताना
माझ्या चड्डीच्या नाडीलासुद्धा
विश्रांतीची गरज भासेल
रेवाशपथ

**अरुणचंद्र गवळी**